शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महोदय / महोदया,

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुका २०१६-१७ - मतदार नोंदणी व मतदानाची टक्केवारी वाढविण्याकरिता उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने मा.अवर सचिव, राज्य निवडणुक आयोग, महाराष्ट्र यांचे क्रमांक-रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र.१२/का-५, दि.२२/०४/२०१६ चे पत्र आपल्या माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित केले आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

कळावे,

आदेशान्वये,

सहा. कुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ २५
दि.: 7 MAY 2016

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र. १२/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २२/०४/२०१६

निवडणूक प्राथम्य

प्रति,
मा. कुलगुरु,
१. मुंबई विद्यापीठ, एम.जी.रोड, फोर्ट, मुंबई
२. श्रीमती नथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई
३. सावित्रीबाई फुले विद्यापीठ, जिल्हा - पुणे
४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, जि.औरंगाबाद
५. स्वामी रामानंद तिर्थ, मराठवाडा विद्यापीठ, जि. नांदेड
६. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, जि. नागपूर
७. संत गाडगे बाबा विद्यापीठ, जि. अमरावती
८. शिवाजी विद्यापीठ, जि. कोल्हापूर
९. सोलापूर विद्यापीठ, जि. सोलापूर
१०. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जि. जळगाव
११. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, जि. रायगड
१२. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली, जि.रत्नागिरी
१३. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, कृषीनगर, जि.अकोला
१४. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहूरी, जि. अहमदनगर
१५. मराठवाडा कृषी विद्यापीठ, जि. परभणी
१६. महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, जि. नागपूर
१७. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, जि. नाशिक

Shivaji University, Kolhapur
Affiliation
Inward No. 114
Date 27/04/2016

विषय:- **स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुका २०१६-१७**
मतदार नोंदणी व मतदानाची टक्केवारी वाढविण्याकरिता उपाययोजना करणे...
संदर्भ:- मा. राज्य निवडणूक आयुक्त यांनी दिनांक १६/३/२०१६ रोजी घेतलेली बैठक.

महोदय,

ऑक्टोबर-२०१६ ते मार्च-२०१७ या कालावधीमध्ये १० महानगरपालिका, १९५ नगर परिषदा/नगर पंचायती, २६ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत येणा-या २९६ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक

निवडणुका होणार आहेत. या निवडणुकांकरिता अधिकाधिक नवीन पात्र मतदारांनी त्यांच्या नावाची नोंदणी करण्याकरिता तसेच मतदार याद्या बिनचूक व अद्ययावत कराव्यात आणि मतदारांमध्ये जागरुकता निर्माण करून मतदानाची टक्केवारी वाढावी या अनुषंगाने मा. राज्य निवडणूक आयुक्तांनी दिनांक १६/३/२०१६ रोजी उपरोक्त विद्यापीठांच्या कुलगुरु/प्रतिनिधींसोबत बैठक घेतली. या बैठकीमध्ये पुढील उपाययोजना करण्याचे निश्चित करण्यात आले :-

(i) भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या निदेशानुसार प्रत्येक महाविद्यालयामध्ये मतदार नोंदणीकरिता नोडल ऑफीसरची नेमणूक करणे आवश्यक आहे. त्यानुसार अशी नेमणूक करण्यात आली आहे याची खात्री करावी.

(ii) सन २०१६-१७ मध्ये राबविण्यात येणाऱ्या मतदार नोंदणी कार्यक्रमादरम्यान मतदार नोंदणी / दुरुस्तीचे अर्ज महाविद्यालयांमध्ये स्विकारण्याकरिता संबंधित उपजिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांशी संपर्क साधून व्यवस्था करावी.

(iii) मतदार नोंदणी केंद्र स्थापन केल्याबाबत योग्य ते फलक, बॅनर परिसरात लावण्यात यावेत जेणेकरुन नजिकच्या मतदारांना या सुविधेचा फायदा घेता येईल.

(iv) प्राप्त होणारे अर्ज विहित कालावधीत संबंधित उपजिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांकडे पोहोचवावेत.

(v) जी काही लेखनसामग्री (उदा. ॲडमिशन फॉर्मस्, ब्रोशर्स, प्रवेश पत्रिका, निरनिराळे फॉर्मस्, माहिती पुस्तिका, पाठ्यपुस्तके, नोट बुक, इत्यादी) छापली जाते त्यामध्ये शेवटच्या पानावर ठळकपणे दिसेल अशा रितीने मतदार नोंदणीसाठी तसेच मतदान करण्यासाठी आवाहन करणारा मजकूर छापण्यात यावा.

(vi) प्रत्येक संस्थेने त्यांच्या वेबसाईटच्या पहिल्या पानावर मतदार जागृतीबाबतचा मजकूर फ्लॅश करावा.

(vii) त्यांच्याकडे काम करणाऱ्या प्राध्यापकांनी वर्तमानपत्रामध्ये मतदार जागृतीबाबत लेख प्रकाशित करावेत.

(viii) टिव्ही चॅनेल्स, रेडिओवर Debates आयोजित करावेत.

(ix) संस्थेच्या परिसरात असलेल्या गृहनिर्माण संस्था दत्तक घेऊन प्रत्येक गृहनिर्माण संस्थेकरिता २० ते ३० मुले ॲम्बेसेडर म्हणून घ्यावीत व त्यांची स्वयंसेवक (Volunteers) म्हणून नियुक्ती करावी.

(अ) या स्वयंसेवक मुलांनी गृहनिर्माण संस्थांना आवश्यकतेप्रमाणे २ ते ३ वेळा भेटी देऊन ज्या व्यक्तींच्या नावाची नोंदणी झालेली नाही अशा व्यक्तींना नाव नोंदणीसाठी प्रोत्साहित करावे.

(ब) NSS इत्यादी मुलांना गृहनिर्माण संस्थांमधील मतदारांना मतदानासाठी जागरुक केल्याबाबत गुण देणे.

(क) उच्चभ्रू वस्तीमध्ये मतदानाची टक्केवारी कमी असल्याने अशा ठिकाणी मतदान जागृतीसाठी विशेष मोहिम राबविणे.

(ड) ज्या लोकांनी पूर्वीच्या निवडणुकीमध्ये मतदान केले नसेल त्यांना मतदानाचे महत्व सांगून आगामी निवडणुकांमध्ये न चुकता मतदान करण्याचे आवाहन करावे.

(x) त्यांनी "निवडणुकांमध्ये नागरिकांनी सक्रिय सहभाग घेण्याची आवश्यकता" या विषयावर वत्कृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, , पोस्टर्स स्पर्धा, वॉल पेन्टिंग स्पर्धा, इत्यादी आयोजित करावे व चांगले काम करणाऱ्या व्यक्तींना महानगरपालिका किंवा इंडिस्ट्रीच्या मदतीने पारितोषिके द्यावीत.

(xi) वर्ष- २०१६ हे लोकशाही वर्ष म्हणून जाहीर करावे व त्यांच्याकडे होणाऱ्या प्रत्येक कार्यक्रमामध्ये (Activities) योग्य ते बॅनर्स लावावेत.

(xii) सोशल मिडियाचा (फेसबुक, व्हॉटसअप, ट्विटर) वापर करून जास्तीत जास्त मुलांपर्यंत मतदानाविषयी जागृती निर्माण करावी. उदा. Post the Pledge, Selfie Competition, इत्यादी.

(xiii) कॉलेजमध्ये होणाऱ्या फेस्टिव्हल्स, फंक्शन्स, चर्चा सत्रे, इत्यादीमध्ये "निवडणूक" हा मुख्य विषय ठेवण्यात यावा.

(xiv) व्हर्च्युअल क्लासरुम किंवा ए व्ह्यू सॉफ्टवेअर च्या माध्यमातून जास्तीत जास्त मुलांशी संपर्क साधून मतदानाविषयी जनजागृती करावी.

(xv) मतदार नोंदणीच्या विशेष पुनरिक्षण कार्यक्रमाच्या दरम्यान महाविद्यालयात मतदार नोंदणी अधिकाऱ्यांना केंद्र स्थापन करण्यासाठी सहकार्य करून या कामामध्ये विद्यार्थ्यांना सहभागी करून घेण्यात यावे.

(xvi) विद्यार्थ्यांना प्रवेश देताना त्यांच्याकडून भरून घेण्यात येणाऱ्या प्रवेश अर्जामध्ये त्यांनी मतदार यादीत नाव नोंदविले आहे किंवा नाही, याची माहिती घ्यावी.

सर्व विद्यापीठांनी त्यांच्या अंतर्गत असलेल्या महाविद्यालयांना वरीलप्रमाणे मतदार नोंदणी व मतदार जागृतीसंदर्भात योग्य त्या सूचना तात्काळ द्याव्यात व त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे याबाबत कृपया लक्ष द्यावे.

आपला,

(स्वाक्षरी)

( नि. ज. वागळे )

अवर सचिव,

राज्य निवडणूक आयोग

प्रत :- मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

F:\महानगरपालिकांची पत्रे\महानगरपालिका निवडणुकीची पत्रे.docx